वाचा :- १) मा. उच्च न्यायालय मुंबई येथील रिट.पि.क्र.१६३००/२०१७ मधील दि.२५/७/२०१७ रोजीचा आदेश
२) श्री.तात्यासाहेब चिंधा पवार व इतर ६१ वादी यांनी न्यायालयाचे निकालानुसार त्यांचे वकीलामार्फत सादर केलेले सविस्तर निवेदन अर्ज दिनांक १८/८/२०१७.
३) मा.कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मुंबई यांचेकडील पत्र क्र.डीईएन २०१६/प्र.क्र.४११/आरथा-१२/ दिनांक ८/०२/२०१७ चे पत्र.
४) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग, शा.नि.क्र.पीअएन १०८९/सीआर ६०५/१७, दि.६ फेब्रु.१९९०.
५) महा.शा.वित्त विभाग,शा.नि.क्र.मप्रन्या-२०१२/प्र.क्र.६९/२०१२/सेवा-३,दि.७ ऑक्टो.२०१६
६) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांची मंजूर टिपणी दिनांक १३/११/२०१७.

---

नाशिक जिल्हा परिषद ,नाशिक
आरोग्य विभाग,
जाक्र.जिपना/आरोग्य/आ-४/४८६/२०१७
नाशिक. दिनांक 2 /१२/२०१७.

-: आ दे श :-

श्री.तात्यासाहेब चिंधा पवार व इतर ६१ आरोग्य सेवक कर्मचारी यांनी जिल्हा हिवताप कार्यालयाकडेस सेवेत असतांनाचे दिलेले तांत्रिक खंड क्षमापित करणेबाबत , वेतन निश्चिती करणेबाबत, तांत्रिक खंड ग्राहय न धरता जिल्हा हिवताप कार्यालयाकडून जिल्हा परिषद सेवेत हजर होईपर्यतची केलेली सेवा ग्राहय धरणेबाबत व त्यानुसार सर्व फायदे मिळणेबाबत मा.उच्च न्यायालय मुंबई येथे रिट पिटीशन क्र.१६३००/२०१७ दाखल केलेली आहे.

• सदरचे रिट पिटीशनची सुनावणी दिनांक २५/०७/२०१७ रोजी होऊन मे. उच्च न्यायालयाने वादी यांनी त्यांचे मागण्यांबाबत सविस्तरपणे आवश्यक कागदपत्रांसह १ महिन्याच्या आंत प्रतिवादी नं.३ म्हणजे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेंकडेस नविन अर्ज सादर करावा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नाशिक यांनी सदरचे निवेदन/अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्वरित चार महिन्याच्या आंत शासन निर्णय नियम विचारांत घेऊन योग्य ते आदेश पारीत करावेत असे आदेश देऊन रिट पिटीशन निकाली काढली आहे. मे. उच्च न्यायालयाचे निर्णयानुसार श्री.तात्यासाहेब चिंधा पवार व इतर ६१ यांनी न्यायालयाचे निकालानुसार त्यांचे वकीलामार्फत सादर केलेले दिनांक १८/८/२०१७. चे सविस्तर निवेदन अर्जाबाबत, शासनाचे वेळोवेळीचे निर्णय तसेच प्राप्त मार्गदर्शनाचा विचार करता खालीलप्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

जिल्हा हिवताप कार्यालयाकडून जिल्हा परिषदेकडे वर्ग झालेल्या आरोग्य सेवक (पु.) कर्मचाऱ्यांचे वेतननिश्चिती व सेवा सातत्याबाबत शासनाचे पत्र दिनांक ०८/०२/२०१७ अन्वये कळविलेले आहे की, शासन निर्णय , ग्राम विकास विभाग, क्र.पीअएन १०८९/सीआर ६०५/१७,दि.६/२/१९९० मधील अनु.क्र.२ नुसार दिनांक १ मे १९६२ रोजी जिल्हा परिषदा अस्थित्वात आल्यापासून राज्य शासकीय कर्मचाऱ्याने राज्य शासनाकडील सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीने अगर मार्फत अर्ज करुन जिल्हा परिषदेकडील पदावर नामनिर्देशनाने नेमणूक स्विकारली असल्यास त्यांची पुर्वीची राज्य शासनाकडील सेवाही त्या राज्य शासकीय सेवेबाबत महाराष्ट्र राज्य नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम ४६(२) व (३) आणि नियम ४८ च्या तरतुदींच्या आधीनतेने निवृत्तीवेतनासाठी ग्राह्य धरण्यात यावी असे स्पष्ट निर्देश आहेत असे कळविलेले आहे. तसेच अशा प्रकरणी सेवा सलग करण्याबाबत शासनाचे कोणत्याही प्रकारचे आदेश नसल्याने श्री.तात्यासाहेब चिंधा पवार व इतर ६१ यांचीही पुर्वीच्या सलग सेवेचा लाभ केवळ निवृत्तीवेतनासाठी ग्राह्य धरण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे शासन निर्णय दिनांक ०७/१०/२०१६ नुसार जिल्हा परिषदेत येण्यापूर्वीची सलग सेवा ही आश्वासीत प्रगती योजनेसाठी ग्राहय धरण्यांत यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत नियुक्ती दिलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवेत पडलेला सेवाखंड माफ करणेचे अधिकार आहे. सदरहू श्री.पवार व इतर ६१ कर्मचारी यांना नाशिक जिल्हा परिषदेत हजर झाल्यापासून त्यांना सेवेत खंड दिलेला नसल्याने त्यांचे नाशिक जिल्हा परिषद सेवेतील खंड क्षमापित करणेबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता नाही. सदर आदेशाची संबंधीताचे मुळ सेवापुस्तकात नोंद घेण्यात यावी. तसेच या आदेशाची तात्काळ व काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी

( दीपककुमार मीना )
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

प्रति- श्री. तात्या चिंधा पवार, आरोग्य सेवक (पुरुष) ,प्रा.आ.के.करंजगव्हाण, उपकेंद्र लेडाणे ता.मालेगाव व इतर ६१
प्रत - माहितीसाठी व उचीत कार्यवाहीसाठी
- गट विकास अधिकारी व तालुका वैद्यकिय अधिकारी, पंचायत समिती (सर्व) , जि.नाशिक
- आयटी सेल, साप्रवि, जि.प.नाशिक यांना जिल्हा परिषदेच्या वेबसाईडवर प्रसिध्दीकरीता
- म.मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जि.प.नाशिक
- ज्ञापन नस्ती / कार्यालयनी प्रत

प्रतिलिपी - सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,बांधकाम भवन,मर्झबान पथ,फोर्ट,मंत्रालय,मुंबई-०१ यांना माहितीसाठी सविनय सादर
- मा.विभागीय आयुक्त,नाशिक विभाग नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर.
- ॲड.अश्विन आर.कापडणीस, जि.प.पॅनल ॲडव्होकेट , उच्च न्यायालय,मुंबई
- ॲड.विनोद पाटील, उद्योग अलंकार अपार्टमेंट,फ्लॅट क्र.७, दुसरा मजला, कासलीवाल अंगण जवळ, प्रांगण सोसा.दर्गारोड, गारखेडा, औरंगाबाद यांना त्यांचे दिनांक २/११/२०१७ चे पत्रानुसार माहितीसाठी

( दीपककुमार मीना )
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक